वाचले :-

१. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४.
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१.

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर. १२ /२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दि.१६/०३/२०२०

**आदेश**

ज्याअर्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत करोना (कोव्हिड १९) या विषाणूचा संसर्ग बाधीत रुग्ण आढळून आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशातंर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत. असे प्रवासी पालघर जिल्हयामध्ये ही परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे करोना विषाणुचा (कोव्हिड १९) संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोना विषाणुचे (कोव्हिड १९) संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे करोना विषाणुचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे इत्यादी बाबी टाळणे आवश्यक आहे.

आणि त्याअर्थी करोना विषाणुच्या (कोव्हिड १९) प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणुची लागण एका संक्रमित रुग्णाकडून अन्य व्यक्तीस / इसमास त्याच्या संपर्कात आल्याने होण्याची शक्यता विचारात घेता, मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पालघर जिल्हयातील पर्यटन व धार्मिक स्थळे जसे झाई, बोर्डी, डहाणू, शिरगांव, सातपाटी, केळवा, अर्नाळा व जिल्हयातील इतर सर्व समुद्र किनारे, महालक्ष्मी मंदिर संस्थान विवळवेढे, जिवँदानी माता संस्थान विरार, शितलादेवी केळवा, इको व्हिलेज (इस्कॉन) गालतरे, शनि मंदिर वाघोली, सदानंद बाबा आश्रम तुगांरेश्वर व जिल्हयातील इतर सर्व धार्मिक स्थळे (देवस्थानच्या पुजाऱ्याकडून केलली जाणारी वैयक्तिक पुजा व अर्चा वगळून), तसेच जिल्हयातील इतर सर्व पर्यटन स्थळे जसे वेगवेगळे धरणे, तरणतलाव, किल्ले इत्यादी ठिकाणी दि.१६/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० या कालावधीमध्ये येण्यास मनाई आदेश लागू करीत आहे.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ व आप्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१(b) नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.१६/०३/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

सही/-xxx
(डॉ.कैलास बा. शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

प्रत:-
१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

व प्रसिध्दीकरीता.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.

४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.

५) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर/जव्हार यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

७) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

८) कार्यकारी अभियंता जलसंपादा विभाग, पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

९) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी.

१०) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा प्रसिध्दीकरीता.

जिल्हा दंडाधिकारी पालघर ★ जिल्हा पालघर ★

सत्यमेव जयते

जिल्हादंडाधिकारी पालघर